प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

संक्षिप्त



## प्रतिभा कॉलेजला सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**पिंपरी :** येथील कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज व क्विल हील फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा जनजागृतीचा उपक्रम गेले दोन वर्षांपासून राबविण्यात येत आहे. या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षाबाबत प्रशिक्षण देण्यात आले. त्यांनी रुपीनगर, तळवडे, लोणावळा परिसरातील शाळा, महाविद्यालये, भाजी मंडई , नागरीवस्ती, बसस्थानके येथे प्रत्यक्ष जाऊन सायबर सुरक्षाबाबत मार्गदर्शन करून जनजागृती केली. या कार्याची दखल घेत क्विक हिल फाऊंडेशनच्या वतीने पुणे येथील आयोजित कार्यक्रमात त्यांना आठ श्रेणीपैकी पाच श्रेणीमध्ये सर्वाधीक पुरस्कार महाविद्यालयाने पटकाविले आहेत. त्यात प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज या महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट सायबर सुरक्षेकरिता सायबर शिक्षण हा राष्ट्रीय पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांनी हा पुरस्कार स्वीकारला. तसेच, शिक्षक श्रेणीत महाविद्यालयातील डॉ. हर्षिता वाच्छांनी, प्रा. सुप्रिया गायकवाड, प्रा. उज्ज्वला फलक यांना, सर्वोत्कृष्ट राष्ट्रपती विजेता पुरस्कार विद्यार्थी दिपू सिंग याला प्रदान करण्यात आला. तसेच, विद्यार्थिनी बतुल परवाला, श्रावणी सावंत, ओम जगताप यांनाही राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, सायबरचे उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे, क्विक हिल फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास काटकर, सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय काटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल साळवी यांहस प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. प्रतिभा महाविद्यालयाला मिळालेल्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. ए .के. वाळुंज, उपप्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया यांसह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

My Pimpri Edition
Jan 24, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com